ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 12 | AUG - 2020

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# मंगळवेढा तालुक्याच्या आर्थिक विकासातील साखर उदयोगाचे योगदान विशेष संदर्भ श्री संत दामाजी सहकारी साखर कारखाना




डॉ. मरे राजकुमार श्रीहरी
श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळ,
ता. खंडाळा, जि. सातारा .

**गोषवारा :**

महाराष्ट्राच्या अर्थकारणात अलिकडच्या काही वर्षात साखर उदयोगाला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. उजनी नदीवरील उजनी धरणातुन नीरा-भीमा पात्रात व कालव्याला मोठ्या प्रमाणावर मंगळवेढा तालुक्यात पाणी उपलब्ध झाले आहे. पाण्याच्या उपलब्धतेमुळे शेतकरी वर्ग नगदी पिकांच्या लागवडीकडे वळला आहे. यामध्ये त्यांनी ऊस पिकाला प्राधान्यक्रम दिला आहे. मंगळवेढा तालुक्यात ऊस साखर क्षेत्र मोठ्या प्रमाणावर वाढल्यामुळे श्री संत दामाजी सहकारी साखर कारखाण्याची ऊभारणी करावी लागली. साखर उदयोगाच्या विकासामुळे मंगळवेढा तालुक्याच्या अर्थकारणाचा चेहरा बदलून गेला.

**कीवर्ड्स :** साखर, लिफ्ट इंरिगेशन, जलसिंचन योजना.

## उद्दिष्ट्ये :

१. मंगळवेढ्याच्या आर्थिक विकासातील साखर उद्योगाचे योगदान स्पष्ट करणे
२. मंगळवेढा तालुक्यातील सामार्थिक परिवर्तनातील साखरउद्योगाचे स्थान स्पष्ट करणे.
३. मंगळवेढा तालुक्यातील साखर उद्योगातील संत दामाजी साखर कारखान्याचे योगदान स्पष्ट करणे
४. मंगळवेढा तालुक्यातील ऊस पिक वाढीतील जलसिंचन प्रणालीचे महत्त्व स्पष्ट करणे

## संशोधनाचे महत्त्व :

मंगळवेढा तालुका सोलापूर जिल्ह्यातील एक कमी पर्जन्यमान असलेला तालुका आहे येथे अन्नधान्य पिकांचे नगदी स्वरुपात मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. मंगळवेढ्याला ज्वारीचे कोठार असे म्हटले जाते ते येथील प्रमुख पिक आहे परंतु यातून स्थानिक लोकांना आर्थिक स्तर उंचावण्याऐवढा मिळकत प्राप्त होत नाही. त्यामुळे येथील लोकांची आर्थिक स्थिती म्हणावी अशी बदली नाही आर्थिक परिवर्तनासाठी येथे औद्योगिक विकास होणे गरजेचे आहे या दृष्टीकोनातूनच मंगळवेढा तालुक्यात अनेक उद्योगधंदे सुरु करण्यात आले. त्यापैकी साखर उद्योग हा एक प्रमुख उद्योग म्हणून नावारूपास आला आहे त्याकरिता अनेक साखर कारखाने मंगळवेढा तालुक्यात उभारण्यात आले. या सर्वात प्रमुख साखर कारखाना म्हणून संत दामाजी साखर कारखान्याने प्रमुख भूमिका बजावली आहेदिवसेंदिवस कारखाना आणि त्यांचे सभासद तसेच सामान्य जनतेचा आर्थिक विकास होत आहे. येथील अनेक लोकांना रोजगारांच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत त्यामुळे लोकांच्या आर्थिक स्थितीमध्ये परिवर्तन होण्यास मदत झाली आहे त्यामुळे मंगळवेढ्याच्या आर्थिक विकासात साखर उद्योगाचे महत्त्वपूर्ण स्थान असलेले दिसून येते तसेच मंगळवेढा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संत दामाजी साखर कारखान्यामार्फत अनेक प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. त्यामध्ये बी-बियाणांचा पुरवठा, मार्गदर्शक व्याख्यानाचे

आयोजन इत्यादी नाविन्यपूर्ण उपक्रम सुरु करण्यात आले आहेत या सर्वांवर प्रकाशझोत टाकणे आवश्यक आहेत. तरच आपणास मंगळवेढा तालुक्याच्या बदलत्या आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय परिवर्तनाचा अन्वयार्थ लावता येईल.

## साखर उद्योगाची पायाभरणी :

साखर हा शब्द मूळ संस्कृत शब्द शर्करा यापासुन आला आहे. अरबी भाषेत सुकर, ग्रीक भाषेत सुखरन आणि इटलियन शब्द सुखरेन अशी साखरेला नावे आहेत. इंग्रजी भाषेत sugar हा शब्द प्रसिध्द आहे. ऊसापासून साखरेची निर्मिती याबदलचे ज्ञान व प्रसार पूर्वेकडील भारत व चीन आणि पश्चिमीकडील अरब देशात झाला. आधुनिक काळात लंडनमध्ये कच्च्या साखरे पासुन पक्की साखर तयार करण्याचे कारखाने निर्माण झाले आहेत. इ. स. १६०० मध्ये स्थापन झालेल्या ईस्ट इंडिया कंपनीने सरखरेचा व्यवहार इतर वस्तुशी सुरु केले.[1] इ सवी सनाच्या चौथ्या शतकात जनरल निरचुव्हज याने अलेक्झांडरसह भारताला भेट दिली. त्याने भारतातील शेतीची पाहणी केली आणि ऊसासबंधी विचीत्र मत स्पष्ट केले. त्याने सांगितले की भारतात लांब झाडे (बांबू) आहेत. त्यालाच तो हॉनी बांबू म्हणजे ऊसाचे बांबू म्हणाला. पुढे इसवी सनाच्या सहाव्या शतकात चीनच्या बादशाहने तसई हेंग ( Tsai heng) याने भारतातील साखर कशी तयार केली जाते हे जाणुन घेण्यासाठी काही माणसे भारतात पाठवली होती. त्या चिनी माणसानी साखर निर्मितीच्या पध्दतीचा अभ्यास करण्यासाठी बिहारला भेट दिली.[2] ऊसाचे पिक घेण्याची पध्दत उत्तम होती. साखर निर्मितीची पध्दत ही इ. स.१८४७ मध्ये आली.[3] इ. स.१९९९ मध्ये भारतात ४६४ साखर कारखाने होते.[4]

सुपीक काळी मृदा व मुबलक पाणि पुरवठा यामुळे मंगळवेढा तालुक्यातील ऊसाचे उत्पादन मोठया प्रमाणावर वाढले. मंगळवेढा तालुक्यातील शेतकऱ्यांचा ऊस भीमा (मोहोळ), भोगावती (वैराग), महाकाली (कवठे महांकाळ), व मानगंगा (आटपाडी) या साखर कारखान्यांना जात होता. हे सर्व कारखाने दूर अंतरावर असल्यामुळे मंगळवेढा तालुक्यातील शेतकऱ्यांचा ऊस कारखाऱ्यांना लवकर पोहचत नव्हता. यामुळे ऊसाचे वजन घटून शेतकऱ्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत होते. मंगळवेढा तालुक्यातील शेतकऱ्यांची ही परिस्थिती मर्दा वकीलांना पाहवत नव्हती. सहकार महर्षी शंकराव मोहिते-पाटील यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनी शेअर गोळा करण्यास सुरुवात केली. शेअर गोळा करत असताना त्यांना अनेक अडचणी आल्या त्या अडचणीवर मात करुन त्यांनी इरादा पत्र इ.स. १९८९ मध्ये शासन शासनाकडून मिळवले. शासन नियुक्त संचालक मंडळ अस्तित्वात आले. किसनलाल मर्दा हे संस्थापक चेअरमन होते तर रतनचंद शिवलाल शहा हे संस्थापक व्हाईस चेअरमन होते. इ. स.१९९२-९३ मध्ये श्री संत दामाजी सहकारी साखर कारखाण्याच्या गळीत हंगामाची चाचणी घेण्यात आली.[5]

## श्री संत दामाजी सहकारी कारखान्याची उभारणी:

श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याची स्थापना इ. स. १९८९ मध्ये श्री किसनलाल मर्दा यांनी मंगळवेढा येथे केली. श्री संत दामाजी सहकारी कारखान्यांची स्थापना करण्याची कारखान्याला इरादापत्र दि ०३/०४/१९८९ रोजी मिळाल्यानंतर राज्य सहकारी कायदा १९६० अन्वये २६/०४/१९८९ रोजी कारखान्याची नोंदणी झाली. प्रकल्प खर्च, श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याचा एकुण प्रकल्प खर्च १८,३९, ५१००० रुपये झाला होता. त्यामध्ये उत्पादक सभासद भाग भांडवल, महाराष्ट्र शासन भाग भांडवल आणि दिर्घमुदतीच कर्ज यांचा समावेश होता.[6]

---

[1] प.म. बर्वे साखर १९७७-१८पृ-क्र. १-८

[2] Navel Deer history of Sugar, Vol chapman and Hall Lid Londun, १९४९, P-st Report of the committee on Co-operative Sugar Factories March १९९९.p-१४

[3] Report of the committee on co-operative sugar factories March 1999. Page no 14

[4] बर्वे- पूर्वोक्त पृ. क्र. ३-४

[5] फाटे डी. बी. कार्यालयीन अधीक्षक श्री. संदासासका मंगळवेढा यांची मुलाखत

[6] तत्रैव १९९१-१९९२ पृ. क्र. १-२

**तक्ता क्र. १**

**खालील तक्त्यात इ.स. १९९२ मधील श्री संत दामाजी सहकारी साखर कारखाना लि. मंगळवेढयाच्या प्रकल्प खर्चाची माहिती दिली आहे.**

| अ. क्र. | तपशील | एकूण रक्कम |
|---|---|---|
| १ | उत्पादक सभासद भाग भांडवल | १,८८,००० |
| २ | महाराष्ट्र शासन भाग भांडवल | ७,०८,००,००० |
| ३ | दिर्घ मुदजीच कर्ज | ९,४३,५१,००० |
| | एकुण प्रकल्प खर्च | १८,३९, ५१,००० |

**आधार : श्री संत दामाजी सहकारी साखर कारखाना लि. मंगळवेढा वार्षिक अहवाल १९९१-९२ पृ. क्र १-२**

वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते, की संत दामाजी सहकारी साखर कारखाना एकुण प्रकल्प खर्च १८,३९,५१००० रु होता. उत्पादक सभासद भाग भांडवलापेक्षा महाराष्ट्र शासनाचे भाग भांडवल जास्त होते. उत्पादक सभासद भाग भांडवल यांच्यापेक्षा दिर्घ मुदतीचे कर्ज जास्त घेतल्याचे स्पष्ट होते.

**तक्ता क्र.२**

**खालील तक्त्यात पाडेगाव ऊस संशोधन केंद्रातून सुधारित जातीचे आणून विकसित केलेल्या जाती**

| अ. क्र. | ऊस गाळप वर्ष | उसाची जात | लागवड क्षेत्र (एकरात) |
|---|---|---|---|
| १ | १९९०-९१ | को ७२९९<br>को ८०१४<br>को ६७१ | ७ ते १० |
| २ | १९९१-९२ | को ७४०<br>को ७२१९<br>को ७१२५ | ५ ते १० |
| ३ | १९९२-९३ | को ७४०<br>को ७२१९<br>कोएम ७१२५ | ५.३० |
| ४ | १९९४-९५ | कोएम ७४०<br>को७७१४<br>को ८६०३२<br>को ७७१४ | ५.२० |
| ५ | १९९५-९६ | कोएम ८८१२१<br>को ७२१९<br>को ८६०३२ | ४.०० |
| ६ | १९९६-९७ | को ७४०<br>को ७२१९<br>को ८६०३२<br>को ७७१४ | ७.३० |

**आधारः श्रीसंदससाका लि. मंगळवेडा, संबंधितवर्षांचे वा. अ.**

वरील तक्त्यात सहा वर्षाच्या कालखंडात कारखान्याने पाडेगाव ऊस संशोधन केंद्रांतूनसुधारित जातीचे निरोगी बेणे आणून ऊस विकास केलेला आहे. याचाच अर्थ आधुनिक संशोधनाची कास धरून कारखान्याला आधुनिक स्वरूप प्राप्त करून दिल्याचे स्पष्ट होते.

साखर उतारा चांगला मिळावा यासाठी कारखान्याकडून अधिक साखर उतारा देणाऱ्या उसाच्या जातीची माहिती शेतकऱ्यांना देण्याचे काम शेतको विभाग करते. कमी काळात परिपक्व होऊन जास्त साखर उतारा देणाऱ्या ऊसाच्या जातीची शेतकऱ्यांनी लागवड करावी यासाठी कारखाना प्रयत्नशिल असतो को ८६०३२ ही कमी काळात परिपक्व होऊन जास्त साखर उतारा देणारी सर्वात चांगली ऊसाची जात आहे. को ८६०३२ ही ऊसाची जात १२ महिन्यात परिपक्व होते व जास्ती जास्त साखर उतारा मिळतो. को ८६०३२ या ऊसाची लागवड शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणावर करावी यासाठी कारखाना प्रयत्नशील असतो. को ८६०३२ ही ऊसाची जात कारखाना व शेतकरी या दोघांनाही परवडनारी आहे. को ६७१ ही ऊसाची सर्वात जास्त साखर उतारा देणारी जात आहे. को ६७१ ही ऊसाची जात दहा ते अकरा महिन्यात परिपक्व होते. मात्र दर हेक्टरी उत्पादन कमी निघत असल्यामुळे को ६७१ ही ऊसाची जात शेतकऱ्यांना परवडत नाही. मात्र ही जात कारखानदारासाठी मोठ्या प्रमाणवर फायदयाची ठरते. को ६७१ या ऊसाचा जातीची लागवड करण्यासाठी शेतकरी फारसा प्रतिसाद देत नाहीत. फुले २६५ हे अलिकडच्या काळात निर्माण झालेले ऊसाची आधुनिक जात आहे. पाडेगाव ऊस संशोधन केंद्राने फुले २६५ ही ऊसाची जात विकसित केली आहे. दर हेक्टरी सर्वात जास्त ऊस उत्पादन देणारी फुले २६५ या जातीची ऊसाची लागवड करण्याकडे शेतकऱ्यांचा कल आहे. मात्र हा ऊस लवकर परिपक्व होण्यासाठी १८ महिन्याचा कालावधी लागतो. मात्र ऊस तोडणीसाठी १८ महिने इतका दिर्घ काळ थांबण्याची शेतकऱ्यांची तयारी नसते. शेतकऱ्यांच्या चुकीच्या धोरणामुळे ऊस परिपक्व होण्यासाठी अगोदरच तोडणीची मागणी केली जाते. यामुळे कारखाण्याचे माठे नुकसान होते.[7]

## पाणी पुरवठा सुविधामुळे ऊस क्षेत्रात वाढ:

पाणी पुरवठा सुविधामुळे इ.स. १९८० नंतर ऊसाचे क्षेत्र मंगळवेढा तालुक्यात वाढले. माढा तालुक्यात उजनी यथे भीमा नदीवर उजनी धरण बांधण्यात आले. यामुळे मंगळवेढा तालुक्यातून जाणाऱ्या भीमा नदीच्या पात्रात बारमाही पाणी उपलब्ध झाले. इ.स. १९८० नंतर उजनीच्या डाव्या व उजव्या कालव्याची निर्मिती झाली, उजनीच्या कालवा क्रमांक ९ चा मोठ्या प्रमाणावर मंगळवेढा तालुक्यात विस्तार झाला. याचबरोबर नीरा कालव्यातून देखील मंगळवेढा तालुक्यातील क्षेत्र मोठया प्रमाणावर ओलिता खाली आले. मंगळवेढा तालुक्यातून जाणाऱ्या माण नदीवर देखील महाराष्ट्र शासनाच्या लघुपाटबंधारे विभागामार्फत कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बांधण्यात आले. वरील सर्व पाणी पुरवठाच्या सोयी उपलब्ध झाल्यामुळे मंगळवेढा तालुक्यात इ.स.१९८० नंतर ऊसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर वाढले.[8] ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊसाला पाणी देण्यासाठी ठिबक सिंचन पध्दतीचा वापर करण्यासाठी तज्ञांची व्याख्याने आयोजित केली जातात. ठिबक सिंचन पध्दतीमुळे पाण्याची मोठ्या प्रमाणावर बचत होते. खतांच्या मात्रा कशा पध्दतीने द्यावेत याचे देखील शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाते. कमीत कमी क्षेत्रात जास्तीत जास्त ऊस उत्पादन कसे घ्यावे याविषयी शेतकऱ्यांना सल्ला दिला जातो.

ऊस लागवडीसाठी तीन फुट, साडेचार फुटी व सहा फुटी सरी कशी सोडावी? याचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना शेतकी विभागाकडून केले जाते. तीन फुट सरी च्या पध्दतीने ऊसाची लागवड करताना दोन सऱ्यामध्ये ऊस लावून एक सरी मधे मोकळी सोडावी. अशा पध्दतीने ऊसाची लागवड केल्याने २/३ पाण्याची व खताची बचत होते. ऊसाच्या पिकामध्ये मोकळी हवा राहते, तसेच भरपुर सूर्य प्रकाश मिळतो. यामुळे दर हेक्टरी उत्पादनात मोठ्या प्रमाणावर वाढ होते. साडेचार फुट सरी व सहा फुट सरी यामध्ये देखील ऊसाची लागवड करता येते. ठिबक संच, खते, बेणे यासाठी कारखान्याकडून शेतकऱ्यांना आर्थिक मदत केली जाते. सदर रक्कम शेतकऱ्याच्या ऊसाचे गाळप झाल्यानंतर त्याच्या ऊसाच्या बिलातून कपात केली जाते.[9]

## लिफ्ट इंरिगेशन आणि उपसा जलसिंचन योजना:

कारखाना कार्यक्षेत्रात ऊस विकास योजना यशस्वीरित्या राबवणेकरिता भिमा नदीवर चार कोल्हापूर टाईप बंधाऱ्यावर कारखान्यातर्फे लिप्ट इरिगेशन योजना हाती घेण्यात आली. बठाण, अरळी, सिध्दापुर आणि माचणूर याठिकाणी कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यावर लिफ्ट इरिगेशन योजना हाती घेऊन १०,००० एकर्स क्षेत्र ओतीताखाली आणले.[10]

---

[7] भालके पी. डी. मुख्य शेतकी अधिकारी यांची मुलाखत

[8] भालके पी. डी. मुख्य शेतकी अधिकारी यांची मुलाखत

[9] भालके तैत्रव

[10] श्री. संदासासकालि. वार्षिक अहवाल १९९६-९७ पृ. क्र. ३-४

याशिवाय ऊस विकासाच्या इतरही योजना हाती घेण्यात आल्या. ठिबक सिंचन, उपसा सिंचन, सुधारित ऊस जातीची लागवड, जमीनीचा पोत सुधारण्यासाठी हिरवळीचे खतांचा वापर, नवीन विहीर खोदणे, जुन्या विहीरी खोल करणे इत्यादी योजनात कार्यक्षेत्रातील सर्व गावामधून जास्तीत जास्त सभासदांना भाग घेता यावा याबाबत कारखाना प्रयत्न करीत आहे.

ऊस पिक संवर्धन, ठिबक सिंचन, पाईपलाईन, ट्रॅक्टर ट्राली खरेदी इत्यादीसाठी सभासदांच्या विनंतीनुसार संबंधित बँकेकडून कर्ज उपलब्ध होण्यासाठी कारखान्याच्या धोरणानुसार हमीपत्रे देण्यात आली आहेत. शेतकऱ्यांच्या मागणी प्रमाणे बैलगाडीसाठी व अन्य शेती सुधारणा कर्ज उपलब्ध होणेसाठी हमीपत्रे देण्यात आली आहेत. मातीच्या गुणधर्मानुसार पिकांचे नियोजन करता यावे यादृष्टीने माती परिक्षण करणेसाठी कार्यक्षेत्रातील निरनिराळया गावातील १२२ शेतकऱ्यांच्या शेतातील मातीचे नमुने गोळा करून परीक्षणासाठी सहाय्यक मृद रसायन शास्त्रज्ञ, मृद चाचणी प्रयोग शाळा सोलापूर यांचेकडे पाठवण्यात आले. त्याच्याकडील अहवालनुसार संबंधित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.[11]

## कारखान्यातील शेतकी विभागाचे कार्य:

ऊसाची लागवड करण्यापासुन ऊस तुटून जाईपर्यंत कारखान्याच्या वार्षिक कार्यक्रमाचे नियोजन करण्याची जबाबदारी कारखान्याच्या शेतकी विभागाकडे असते.

कारखान्याच्या शेतकी विभागाकडे नियोजन असते. नियोजन करत असताना शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी ऊस पिक परिसंवादाचे आयोजन केले जाते. जमिनीची मशागत कशी करावी? ऊसाची लागवड कशी करावी? पाण्याचे व्यवस्थापन कसे करावे? कोणती खते दयावीत? व जास्तीत जास्त उत्पादन कसे घ्यावे? इत्यादींचे परिसंवादामध्ये मार्गदर्शन केले जाते.

कारखान्याची गाळप क्षमता लक्षात घेऊन ऊसाची योजनाबद्ध पध्दतीने लागवड करण्याचा कार्यक्रम शेतकी विभागाकडून आखला जातो. खोडवा ऊस सोडून आडसाली, पूर्व हंगाम, सुरु हंगाम या टप्यात कारखाना क्षेत्रात ऊसाची लागवड केली जाते.[12]

## ऊस लागवडीसाठी शेती तज्ज्ञांची व्याख्याने :

श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याने कार्यक्षेत्रामधील गावामध्ये ऊस पिकांची योग्यरित्या लागवड व्हावी यासाठी शेतकऱ्यासाठी शेती तज्ज्ञ, कृषी विद्यापीठातील तज्ज्ञाची व्याख्याने आयोजीत केलेली होती. मंगळवेढा तालुक्यातील कृषी क्षेत्रामध्ये ऊस पिकाची शास्त्रोक्त व किफायतशीररित्या लागवड होण्यासाठी कृषी विद्यापिठातील कृषी तज्ज्ञांची व्याख्याने या साखर कारखान्याने शेतकऱ्यांसाठी आयोजित केलेली होती. कृषी विद्यापिठातील कृषी तज्ज्ञानी व्याख्याने व स्लाईड शो या माध्यमातून ऊस पिकांचे नियोजनरित्या अधिक पीक कसे घेता येईल? या विषयावर मार्गदर्शन केलेले होते. या माहिती अंतर्गत कृषी तज्ज्ञांनी ऊस पिकासाठी योग्य ऊस बियाणांची निवड, रासायनिकरित्या खताची मात्रा, पाण्याचे योग्य नियोजन याबाबत माहिती दिलेली होती. शेती तज्ञांच्या व्याख्यामुळे शेतकऱ्यांना अधिक ऊसाची व साखर उतारा या संबंधीची संपूर्ण माहिती मिळाली होती. श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याने वेळोवेळी कृषी तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करुन तालुक्यात ऊस पिकाचे उत्पादन कसे वाढेल? यावर लक्ष केंद्रित केलेले होते. साखर कारखान्याने आपल्या कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादन सभासद शेतकऱ्यांना ऊस लागवडीबाबत मार्गदर्शन होण्यासाठी एकूण पाच पिक परिसंवाद आयोजित केले होते. या पीक परिसंवादात कृषी विद्यापिठातील तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले होते.[13]

## कारखाना कार्यक्षेत्रात ऊस उपलब्धता :

मंगळवेढा तालुक्यातील साखर कारखान्यासाठी पीकवार ऊस उपलब्ध होता. कारखान्याचे सभासद बीगर सभासद यांचेकडून आडसाली, पूर्वहंगामी सुरु खोडवा असा पीकवार ऊस उपलब्ध होत होता.

---

[11] तैत्रव

[12] भालके तैत्रव

[13] भालके तैत्रव

तक्ता क्र. ०३

खालील तक्त्यात इ.स. १९९४-९५.१९९५-९६ आणि १९९६-९७ या तीन वर्षातील श्री सदासकदालि मंगळवेढा या कारखान्याची पीकवार ऊस उपलब्धता दाखवली आहे.

| अ क्र. | गाळप वर्ष | आडसाली | पूर्व हंगामी | सुरु | खोडवा | एकूण (हेक्टर्स) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९९४-९५ सभासद | २७४.०० | २४६. ७५ | १४०६.७५ | ८७५.७० | २८०३.२० |
| | बिगर सभासद | २५.९५ | ५५.१० | ५०३.७० | १०९.६० | ६९४.३५ |
| | एकूण | २९९.९५ | ३०१.८५ | १९१०.४५ | ९८५.३० | ३४९७.५५ |
| २ | १९९५-९५ सभासद | २४७.६५ | ३५४.१० | ३४६.७० | १८०६.९५ | २७५५.४० |
| | बिगर सभासद | ६५.७५ | १२९.६० | १६५.३० | ४४८.२० | ८०८.८५ |
| | एकूण | ३१३.४० | ४८३.७० | ५१२.०० | २२५५.१५ | ३५६४.२ |
| ३ | १९९६-९७ | १९५.९५ | २४४.४५ | ४५०.१५ | १६.१.२५ | २४५१.८० |
| | बिगर सभासद | ८५.७० | १३१.५० | २४२.४० | ६७७.६० | ११३७.२० |
| | एकूण | २४१.६५ | ३७५.९५ | ६९२.५५ | २२७८.८५ | ३५८९.०० |

**आधार : श्रीसंदाससकाली. मंगळवेढा, संबंधित वर्षाचे वा अ.**

वरील तक्त्यात तीन वर्षांतील श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याच्या ऊसाच्या विविध पीकाची माहिती स्पष्ट केली आहे. आडसाली पूर्वहंगामी सुरु आणि खोडवा या प्रकारच्या ऊस गळीतासाठी वापरला आहे. कारखान्याच्या सभासद शेतकऱ्यांचा व बीगर सभासद शेतकऱ्यांचा ऊस कारखान्याने गाळलेला आहे. कारखान्याला सभासद शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणवर ऊस पुरविला आहे. इ.स. १९९४-९५ या वर्षात चार प्रकारच्या ऊसापैकी सुरु ऊस जास्त पुरविला आहे. इ.स. १९९५-९६ या वर्षात चार प्रकारच्या ऊसापैकी खोडवा ऊस शेतकऱ्यांनी जास्त पुरविला आहे. इ.स.१९९६-९७ खोडवा ऊस शेतकऱ्यांनी इतर प्रकारच्या ऊसापेक्षा जास्त पुरविल्याचे स्पष्ट होते.

### श्री संत दामाजी सहकारी साखर कारखाना लि. मंगळवेढा ची सभासदसंख्या:

प्रत्येक साखर कारखाना हा सहकारी क्षेत्रातील नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली व भौगोलिक क्षेत्रावर अवलंबून असतो. त्याबरोबर त्या सहकारी साखर कारखान्याच्या परिसरातील लोकांच्या सहकार्यावरच यशस्वीरित्या चालू शकतो. सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील लोकाची कारखान्यात काम करण्याची तयारी पाहिजे तरच साखर कारखाना यशस्वी चालू शकती. श्री संत दामाजी सहकारी कारखान्याने मंगळवेढा तालुक्यातील स्थानिक नेत्यांना विश्वासात घेऊन साखर कारखान्यासाठी आवश्यक सभासद संख्या वाढवण्यासाठी प्रयत्न केले. श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेनंतर कारखानाच्या सभासद संख्येत वाढ झालेली आहे.[14] सभासद संख्येच्या वाढीची माहिती तक्ता क्र. ०४ मध्ये दिलेली आहे.

[14] श्री. संदासासकालि. वार्षिक अहवाल १९९१-९२ ते २०१०-११

तक्ता क्र.०४

खालील तक्त्यात इ.स. १९९१ ते २०१०-११ या काळातील श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याची सभासद संख्या

| अ क्र. | वर्ष | अ वर्गसभासद उत्पादक सभासद | ब वर्ग सभासद अनुउत्पादक संस्था | नाममात्र (संख्या) क वर्ग | महाराष्ट्र शासन | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९९१-९२ | ८५४७ | ६२ | ०० | १ | ८६१० |
| २ | १९९२-९३ | ८८१० | ६२ | ०१ | १ | ८८७४ |
| ३ | १९९३-९४ | ९५१० | ७० | १२ | १ | ९५९३ |
| ४ | १९९४-९५ | ९४९७ | ७० | १० | १ | ९५७८ |
| ५ | १९९५-९६ | ९४२१ | ७० | १९८ | १ | ९६९० |
| ६ | १९९६-९७ | ९४८२ | ७० | २६० | १ | ९८१३ |
| ७ | १९९७-९८ | ९४८५ | ७० | १४७ | १ | ९७०३ |
| ८ | १९९८-९९ | ९४८० | ७० | २०० | १ | ९७५१ |
| ९ | १९९९-२००० | १२३५१ | ७० | १९८ | १ | १२६२० |
| १० | २०००-०१ | १३०६४ | ७० | १७० | १ | १३३०५ |
| ११ | २००१-०२ | १३०६४ | ७० | २०२ | १ | १३३३७ |
| १२ | २००२-०३ | १३६२५ | १४९ | ८८५ | १ | १४५७१ |
| १३ | २००३-०४ | १३७७५ | १६० | २२५ | १ | १४१५० |
| १४ | २००४-०५ | १३७२३ | १६२ | १७ | १ | १३९०१ |
| १५ | २००५-०६ | १४०४१ | १६२ | २२१ | १ | १४४२५ |
| १६ | २००६-०७ | १४०४१ | १६२ | १३८ | १ | १४३४२ |
| १७ | २००७-०८ | १४०४१ | १६२ | १३८ | १ | १४३४२ |
| १८ | २००८-०९ | १४०४१ | १६२ | निरंक | १ | १४२०४ |
| १९ | २००९-१० | १४४२६ | १६२ | निरंक | १ | १४५८९ |
| २० | २०१०-११ | १४४३३ | १६२ | निरंक | १ | १४५९६ |

**आधार : श्रीसंदाससकाली. मंगळवेढा, संबंधित वर्षाचे वा अ.**

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याच्या सभासद संख्येमध्येसातत्याने वाढ झालेली आहे. इ. स. १९९१-९२ या वर्षात कारख्यान्याचे अ वर्ग सभासद ८,५४७ आणि ब वर्ग सभासद ६२ असे एकुण ८,६०९ सभासद होते. इ. स. २०१०-११ या वर्षात कारखान्याचे अ वर्ग सभासद १४,४३३ आणि ब वर्ग सभासद १६२ असे एकूण १४,५९५ सभासद होते. याचाच अर्थ कारखान्याच्या सभासद संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली दिसून येते.

### श्री संत दामाजी सहकारी साखर कारख्यान्यामधील ऊस गाळप:

श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याची स्थापना इ. स. १९८९ मध्ये झाली होती. परंतु प्रत्यक्षात या कारखान्यामधून ऊसाचे गाळप हे इ. स. १९९३ मध्ये सुरु झाले. या साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रामधील ऊसाबरोबरच कार्यक्षेत्राबाहेरील ऊस गाळपास आणून अधिक साखर उत्पादन कसे वाढेल याकडे प्रारंभीपासून लक्ष दिले होते. श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याने केलेल्या ऊस गाळपाची माहिती पुढील तक्ता क्र.०५ मध्ये दाखवली आहे.

**तक्ता क्र.०५**

**खालील तक्यात इ. स. १९९२-९३ ते २०१०-११ या काळातील श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याची ऊसगाळपाची माहिती दिली आहे.**

| अ क्र. | वर्ष | कारखान्याचा स्वत:चा ऊस (मे टन) | कार्यक्षेत्रातील उसाचे गाळप (मे टन) | कार्यक्षेत्राबाहेरील उसाचे गाळप (मे टन) | महाराष्ट्राबाहेरील उसाचे गाळप (मे टन) | एकूण (मे टन) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९९२-९३ | ४७ | १५२३ | निरंक | निरंक | १५७० |
| २ | १९९३-९४ | निरंक | ८९९५३७२२ | निरंक | निरंक | ८९९५३.७२२ |
| ३ | १९९४-९५ | १७४ | १२५६८३ | ८८७०८ | ५०२३९ | २६४७७७ |
| ४ | १९९५-९६ | ३४५ | ११५६११ | २१५३७८ | निरंक | ३३१३३४ |
| ५ | १९९६-९७ | २६९ | १५६६१२ | ६३४२३ | २१७६८ | २४२०७२ |
| ६ | १९९७-९८ | ३७१ | २२६१७३ | १४१३४५ | २८२२० | ३९६१०९ |
| ७ | १९९८-९९ | निरंक | २४७३७४ | २८००२९ | निरंक | ५२७४०३ |
| ८ | १९९९-२००० | निरंक | ४४२२४५ | १६७७८३ | निरंक | ६१००२८ |
| ९ | २०००-०१ | निरंक | ४४९६९९ | १३२४७५ | निरंक | ५८२१६६ |
| १० | २००१-०२ | निरंक | १९७७८९ | १४५०२२ | ३६१९८ | ३७९००९ |
| ११ | २००२-०३ | निरंक | २११०६९ | २२७५३ | ३९३९४ | २७३२१६ |
| १२ | २००३-०४ | निरंक | २८०९ | २०४९ | ६६७ | ५५६५ |
| १३ | २००४-०५ | बंद | बंद | बंद | बंद | बंद |
| १४ | २००५-०६ | निरंक | १८१९५७ | २२८८३ | १९७६५ | ३२४६०५ |
| १५ | २००६-०७ | निरंक | ४१७४८४ | १४१२३७ | ४६७३७ | ६०५४५८ |
| १६ | २००७-०८ | निरंक | ४१७४८४ | १४१२३७ | ४६७३७ | ६०५४५८ |
| १७ | २००८-०९ | निरंक | ४१२८४३.९०० | १५२३२.७५० | निरंक | ४२८०७६.६५० |
| १८ | २००९-१० | निरंक | १५१७७८६९० | ५५४२९.७८० | निरंक | २०७२०८.४७० |
| १९ | २०१०-११ | निरंक | ३२००४५.५२० | १०८५८९.८३ | ३३९२१६१० | ४६२५५६.९६० |

**आधार : श्रीसंदाससकाली. मंगळवेढा, संबंधित वर्षाचे वा. अ.**

वरील तक्त्यात इ.स. १९९२-९३ ते इ.स. २०१०-१९ या १९ वर्षापैकी इ.स. २००४-०५ या वर्षी ऊसाचे गाळप झाले नाही. त्या वर्षी दुष्काळामध्ये कारखाना बंद होता. या एक वर्षाचा अपवाद वगळता कालखंडातील १८ वर्षात कारखान्याने ऊसाचे गाळप चांगल्या प्रकारचे केल्याचे स्पष्ट होते. कार्यक्षेत्रातील ऊसाच्या गाळपामध्ये कारखाना, मंगळवेढा, बोराळे पाटकळ आणि मरवडे असे पाच विभाग होते या पाच विभागाधील सभासद व बिगरभासद यांच्या ऊसाचे गाळप केले आहे. कार्यक्षेत्राबाहेरील ऊसाचे गाळप म्हणजे महाराष्ट्र राज्यातील ऊसाचे गाळप होय. महाराष्ट्राच्या बाहेरील म्हणजे शेजारच्या कर्नाटक राज्यातील ऊसाचे गाळप केले आहे. वरील तक्त्यात इ.स.१९९२-९३ या वर्षात फक्त १५७० मेट्रिक टन ऊसाचे गाळप केले आहे हे गाळप कमी झाले आहे कारण कारखान्याच्या गाळपाची ही सुरुवात होती. त्यानंतर इ.स. १९९३-९४ या वर्षापासून पुढे कारखान्याने सातत्याने गाळप शक्ती वाढविली आहे. या कारखान्याचे वैशिष्ट्य म्हणजे स्वतः कारखान्याने ऊस पिक घेऊन त्याचे गाळप केले आहे. इ. स. १९९९-२००० या वर्षात सर्वाधिक म्हणजे ६,१०,०२८ मेट्रिकटन ऊसाचे गाळप केले आहे .[15]

[15] श्री. संदासासकालि. वार्षिक अहवाल १९९९ ते २०००.पृ. क्र. १३.

**श्री संत दामाजी सहकारी साखर कारखाना लि. मंगळवेढा मधील साखर उत्पादनः**

कारखाना स्थापनेपासून कारखाना उभारणीचा काळखंड ३ ते ४ वर्ष गेला होता. त्यामुळे साखर कारखान्याची स्थापना होऊन प्रत्यक्ष ऊसाचे गाळप होवून साखर उत्पादित होण्यास १९९३ वर्ष उजाडले. त्यामुळे इ. स. १९९२-९३ पासून या सहकारी साखर कारखान्यातून पूर्ण क्षमतेने साखरेचे उत्पादन होऊ लागले.[16] या साखर कारखान्यातून उत्पादित होणाऱ्या साखरेची माहिती तक्ता क्र. ०६ मध्ये दाखविली आहे.

**तक्ता क्र.०६**

**खालील तक्त्यात इ.स. १९९२-९३ ते २०१०-११ या काळातील श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्यामधील साखर उत्पादनाची माहिती दिली आहे.**

| अ क्र. | वर्ष | साखर उत्पादन (एकूण पोत्यामध्ये) | साखर उतारा | उसाला दिलेला अंतिम भव (दर टनास) |
|---|---|---|---|---|
| १ | १९९२-९३ | २६५ | ६.६१ % | ५४४ |
| २ | १९९३-९४ | ८६७६५ | ९.६७ % | ६६७ |
| ३ | १९९४-९५ | ३५६२१३ | १० % | ६८१ |
| ४ | १९९५-९६ | ४१६२३५ | ९.५७% | ६०५ |
| ५ | १९९६-९७ | २५४९५० | १०.५४% | ६५१ |
| ६ | १९९७-९८ | ४०२३२० | १०.१९ % | ७७५ |
| ७ | १९९८-९९ | ५९९६५० | ११.३५ % | ८८५ |
| ८ | १९९९-२००० | ६४९४५१ | १०.६५ % | ८३७ |
| ९ | २०००-०१ | ६५४५०० | ११ .२६ % | ८४० |
| १० | २००१-०२ | ४१११३० | १०.८४% | ७६० |
| ११ | २००२-०३ | ३००५८० | ११ % | ७१० |
| १२ | २००३-०४ | २०४० | ६.०१% | ७५० |
| १३ | २००४-०५ | बंद | बंद | बंद |
| १४ | २००५-०६ | ३७१६८० | ११.४५ % | १३०० |
| १५ | २००६-०७ | ६५८५०० | १०.९० % | ८५० |
| १६ | २००७-०८ | ६५८५०० | १०.९०% | ८५० |
| १७ | २००८-०९ | ४९७३५० | ११.६० % | ८५१ |
| १८ | २००९-१० | २१८८०० | १०.५४ % | १८०० |
| १९ | २०१०-११ | ५१८२५० | ११.२२ % | २२०० |

**आधार श्रीसंदाससाकालि मंगळवेढा, संबंधीतवर्षाचे वा.अ**

वरील तक्त्यावरून आपणास असे दिसून येते की, संत दामाजी सहकारी साखर कारखान्याचे गाळप इ.स. १९९२-९३ पासून सुरु झालेली आहे. कारखान्याचा चाचणी हंगाम असल्याने गाळप कमी झाल्यामुळे साखर उत्पादन कमी झालेले आहे. केवळ २६५ पोती साखर उत्पादित झाली आहे. साखर उतारा ६.६१% मिळाला आहे. दर टनास ऊसाला ५४४ रु दर दिला आहे. त्यानंतर १९९३-९४ ते २००२-०३ या काळात साखरेचे उत्पादन वाढत गेल्याने दिसून येते. या काळातील इ.स.२०००-०१ या वर्षात ६,५४,५०० पोती एवढे सर्वाधिक साखरेचे उत्पादन झाले आहे. तर साखरेचा उतारा ११.२६% मिळाला आहे. शेतकऱ्यांना कारखान्याचे दर टनास ऊसाला दर ८४० रु दिलेला आहे.

[16] श्री. संदासासकालि. वार्षिक अहवाल १९९२-९३ ते २०१०-११.

इ. स. २००३-०४ या वर्षात २,०४० पोती एवढे साखरेचे उत्पादन झाले आहे. साखरेचा उतारा १९ वर्षातील सर्व वर्षापेक्षा अत्यंत कमी मिळाला आहे. इ.स. २००८-०९ या वर्षातील उतारा ११.६०% मिळाला आहे. इ. स. १९९८-९९,२००५-०६ आणि २००८-०९ या वर्षात साखरेचा उतारा अनुक्रमे ११.३५% ११.४५% व ११.६०% ऐवढा मिळालेला आहे. ऊस गाळप, साखर उत्पादन, सरासरी साखर उतारा या सर्वच बाबतीत या कारखान्याने सोलापूर जिल्हयात विक्रम स्थापन केला आहे. आतापर्यंतच्या मागील झालेल्या गळीत हंगामामधील ऊस गाळप, साखर उत्पादन, सरासरी साखर उतारा याची आकडेवारी पहाता वरील तीन वर्षांतील कारखान्याची आकडेवारी निश्चीतच उल्लेखनीय आहे.[17] इ.स.१९९२-९३ ते २०१०-११ या १९ वर्षात इ.स. २०१०-११ मध्ये कारखान्याने शेतकऱ्यांना सर्वाधिक म्हणजे २२००रु प्रत्येकी टनास दर दिला आहे. इ. स. २००५-०६ ते २०१०-११ या काळात साखर उत्पादन वाढलेले आहे.

## निष्कर्ष :

श्री संत दामाजी सहकारी साखर कारखाना लि. मंगळवेढा या साखर कारखान्याने मंगळवेढा तालुक्यातील लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात आमूलाग्र असा बदल घडविण्याची महत्वाची भूमिका बजावलेली आहे. या साखर कारखान्याने कार्यक्षेत्रामध्ये अनेक कल्याणकारी योजना राबविल्या आहेत. साखर कारखान्याने राबविलेल्या सर्व योजना सभासद शेतकरी व बिगर सभासद शेतकरी या दोघांसाठी राबविलेल्या आहेत. साखर कारखान्याने सर्व योजना जास्तीत जास्त यशस्वी कशा होतील? यावर पूर्ण लक्ष केंद्रित कलेले आहे. त्यामुळे साखर उत्पादनात वाढ होवून साखर कारखान्याची आर्थिक स्थिती मजबूत बनली. साहजिकच मंगळवेढा तालुक्यातील प्रगतीमध्ये वाढ झाली. मंगळवेढा तालुक्यातील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावला. श्री संत दामाजी सहकारी कारखान्याने राबविलेल्या विविध योजनामुळे मंगळवेढा तालुक्यातील लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनामध्ये प्रगती घडून आलेली आहे.

[17] श्री. संदासासकालि. वार्षिक अहवाल१९९७-९८. पृ. क्र. ५-६.